| | |
|---|---|
| **MHAU070021192025** | **नि.दि.दावा क्रमांक ३७८/२०२५**<br><br>**निशाणी क्रमांक २४ लगत**<br>**वादी तर्फे सा.क्र.१** |

**प्रकरण प्रतिवादी क्र.२ ते ५ विरुध्द एकतर्फा.**

**निशाणी ६३ वरील आदेशाप्रमाणे उलटतपास प्रतिवादी क्र.१ तर्फे विधीज्ञ श्री.आर.यु.गव्हाणे यांच्या मार्फत शपथेवर सुरु-**

माझे शिक्षण दहावी पर्यंत झालेले आहे. मला मराठी लिहीता वाचता येते. हे म्हणणे खरे आहे की, जी जागा महापारेषण कंपनीद्वारे अधिग्रहीत केली आहे त्याचा मला मिळालेला मोबदला मान्य आहे. हे म्हणणे खरे आहे की, जी जागा कंपनीद्वारे अधिग्रहीत केली त्याच जागेवर कंपनीचे सबस्टेशन उभारलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर सबस्टेशनला चारही बाजुने संरक्षण भिंत बांधलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.१ हे संरक्षण भिंतीच्या आतील बाजुची जागा वापरत आहे.

साक्षीदाराला प्रश्न विचारला की, सरंक्षण भिंतीच्या बाहेरील जागेवर प्रतिवादी क्र.१ यांचे कोणतेही खांब अथवा पोल उभे नाहीत, साक्षीदार सांगतात की, संरक्षण भिंतीबाहेर असणाऱ्या खांबवरुन अथवा पोलवरुन प्रतिवादी क्र.१ यांच्या कार्यालयातुन जोडून आणलेली विज वाहतुक तार टाकलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, सब स्टेशनमधुनच गंगापूर शहर व तालुका येथे विज पुरवठा केला जातो आहे. हे म्हणणे खरे आहे की, विज वाहतुक करण्यासाठी आमच्या शेतामध्ये विजेचे खांब बांधलेले आहेत, टावर उभे केलेले नाहीत.

साक्षीदाराला प्रश्न विचारला की, विज वाहतुक करण्यासाठी तुमच्या शेतामध्ये उभे केलेले खांब याचा प्रतिवादी क्र.१ यांच्याशी संबंध येत नाही, साक्षीदार सांगतो की, त्यांचाच त्याच्याशी संबंध येतो, त्यांनीच विज जोडून दिलेली आहे. हे मला माहीत नाही की, पुर्वीचे महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळ हे तीन विभागामध्ये वाटलेले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, विज कोण पुरवते व विजबील कोणाकडे

भरले जाते याची मला माहीती आहे. हे म्हणणे खरे आहे की, विज बील हे महाराष्ट्र महावितरण कंपनी यांच्याकडे भरले जाते व त्यांच्याद्वारेच विजबील प्रस्तुत केले जाते.

हे म्हणणे खरे आहे की, दाव्यासोबतच्या कागदपत्र यादी निशाणी क्र.२६ सोबत दाखल केलेले छायाचित्रांपैकी पान क्र.६ वरील छायाचित्र दाखवले, त्यामधील विजेचे खांब हे माझया शेतात उभे आहेत, मनोरे माझया शेतात उभे नाहीत, सदर छायाचित्रास **निशाणी क्र.६५** देण्यात येते. हे म्हणणे खरे नाही की, माझे . विद्युत खांबामुळे होणारे नुकसान मिळावे म्हणुन प्रतिवादी क्र.१ याचेकडे अर्ज केलेला नाही. सदरचा अर्ज मी सन २०१४ साली दिलेला होता. सदर अर्जाची प्रत प्रकरणामध्ये दाखल केलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, आता मला दाखवलेला अर्ज हा सन २०१८ चा आहे सन २०१४ चा नाही. तो निशाणी ३४ वर आहे.

हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१ यांनी मला नोटीस पाठवुन सदरचे पोल हे महावितरण कपंनीचे असल्याचे कळवले आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१ यांचा या दावामध्ये नमुद विजेच्या खांबांशी काहीही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, विजेच्या खांबांशी प्रतिवादी क्र.१यांचा संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१ हे मला नुकसान भरपाई देणे लागत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादी क्र.१ सोबत विनाकारण दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत

Digitally signed by NILESH RAJARAM INDALKAR
Date: 2026.03.17 15:12:32 +0530

दिनांकः- १७.०३.२०२६

(निलेश रा. इंदलकर)
दिवाणी न्यायाधीश व.स्तर,
गंगापूर